पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १०/४/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ३२**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. २/४/२०१८ चे पत्र.

महानगरपालिकेच्या स्वर्गीय राजीव गांधी रुग्णालयामध्ये बाळांतपणासाठी दाखल झालेल्या रुग्णाला महापालिकेच्या डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे प्राणास मुकावे लागले. सदरची बाब अत्यंत बेजबाबदारपणाची व खेदजनक आहे. वास्तविक पहाता कै .शुभांगी जानकर या गरोदर महिलेस वेळेवर उपचपार मिळाले असते तर तीचे प्राण नक्कीच वाचले असते. या घटनेची जबाबदारी महापालिकेस नाकारता येत नाही. कै.शुभांगी जानकर यांच्या अकास्मिक मृत्यूने तीच्या कुटूंबाचे कोणत्या स्वरुपात कधीही भरुन न येणारे नुकसान झाले आहे.

तरी महानगरपालिकेची नैतिक जबाबदारी म्हणून कै .शुभांगी जानकर या मयत रुग्णाच्या कुटूंबास र.रु.१० लक्ष इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी किंवा तीच्या कुटूंबातील एका जबाबदार व्यक्तीस महानगरपालिकेमध्ये नोकरी द्यावी.

**विषय क्र. ३३**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. २/४/२०१८ चे पत्र.

महानगरपालिके तर्फे देण्यात येणारे मिळकतकरांची देयके संबंधित मिळकतधारकांकडून मुदतीत भरली न गेल्यास या मिळकतकर आकारणीवर दरमहा २% वाढीने व्याज आकारणी केली जाते. या वाढीव व्याजाची रक्कम एकत्रित केल्यास थकबाकीदार मिळकतकरधारकास एकूण मिळकतकरावर अंदाजे २७ ते २८% वार्षिक व्याज भरावे लागते. वाढीव दराने व्याज आकारणी करण्यासंदर्भात मनपा कायद्यात कोणतीही तरतूद करण्यात आलेले नाही .त्यामुळे सदरची व्याज आकारणी ही गोरगरीब व मध्यमवर्गीय नागरिकांची आर्थिक लूट करणारी आहे. थकीत मिळकतकराची रक्कम वसूल करण्याचे उद्दीष्टे पूर्ण करण्याकरिता महापालिके तर्फे व्याजामध्ये सवलती जाहिर करुन ती वसूल करण्याचे प्रयत्न झाले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेला देखील आर्थिक नुकसान होत असते. त्यामुळे राष्ट्रीयकृत बॅन्केच्या धोरणानुसार वार्षिक व्याज आकारणी केल्यास थकबाकीदार देखील मिळकतकर भरु शकतील .

तरी जे मिळकतीधारक त्यांना मिळणारी देयके मुदतीत भरु न शकल्यास या थकीत रकमेवर राष्ट्रीयकृत बॅन्केच्या धोरणानुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून थकीत रकमेवर वार्षिक व्याज आकारणी करण्यात यावी.

**विषय क्र. ३४**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.२/४/२०१८ चे पत्र.

राज्य शासनाने सन २००९ मध्ये परिपत्रक काढून बांधकाम क्षेत्राशी निगडीत जेवढे बांधकाम कामगार आहेत. त्यांना एक सामाजिक कवच देणेकरीता बांधकाम कामगार मंडळाची स्थापना केली. हे बांधकाम मंडळ राज्य शासनाच्या अधीन राहून वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबांना शिक्षण , आरोग्य, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा म्हणून निधी व सुविधा यांना देत असते.

पुणे शहरामध्ये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जेवढे बांधकामांना परवानगी दिली जाते. त्या बांधकामांच्या परवानगी शुल्कामध्ये १ टक्का रक्कम बांधकाम कामगार मंडळाला सेस म्हणून वर्ग केली जाते. आज मितीस संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जवळजवळ १२००० कोटी रूपये ही योजना चालू झाल्यापासून राज्य शासनाकडे जमा आहे. परंतू या बांधकाम कामगारांची नोंदणी कामगार आयुक्तांकडे होत नाही. याकरीता राज्य शासनाकडे पुणे महानगरपालिकेस पत्रव्यवहार देखील केला होता. परंतू त्याला अत्यल्प प्रतिसाद मिळाला.

पुणे महानगरपालिकेतर्फे क्षेत्रीय कार्यालय, विभागीय आयुक्त, व मुख्य खात्यांच्या वतीने बांधकाम व बांधकाम तत्सम कामाची हजारो टेंडर्स काढली जातात. प्रशासनाने पुणे महानगरपालिकेमध्ये ही कामे होत असताना त्या बांधकाम कामगारांचे रक्षण व्हावे त्याला बांधकाम कामगार मंडळाचे फायदे मिळावे यासाठी प्रशासनाने संबंधित खात्यांच्या टेंडरमध्ये

ही अट टाकावी, की त्यासंबंधी ठेकेदाराने त्यांच्याकडे काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची नोंदणी व त्यांचे प्रमाणपत्र हे टेंडरसोबत जोडण्यात यावे.

तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जेवढया बांधकामांना परवानगी दिली जाते. या परवानग्या देताना बांधकाम चालू करताना भोगवटा पत्र देणे आधी संबंधित आर्किटेक्टने , विकसकाने त्या इमारतीचे बांधकाम ज्या ठेकेदारामार्फत कामगार काम करीत आहे. त्या कामगारांची कामगार आयुक्तांकडे नोंदणी व नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

वरील दोन सुचनांचे अध्यादेश प्रशासनाने काढल्यास या सर्व गोरगरीब , कष्टकरी कामगारांमुळे पुणे शहराचे वैभव वाढविण्यास आणि बांधकाम कामगारांना पुणे शहरामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक सुरक्षितता दिल्या सारखे होईल.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. ३५**

सन २०१८-२०१९ च्या बजेट मध्ये पूर्वीप्रमाणे क्षेत्रिय कार्यालयामार्फत टेंडर लावण्याच्या पध्दती सुरू करावी, जेणेकरून त्या त्या भागातील ठेकेदारामार्फत दिवे बदलून घेणे सोयीस्कर होईल व लाँगलाईफ दिवे ठेकेदाराकडून पुरविले जातील. तेव्हा सन २०१७ च्या पूर्वीची कार्यपध्दतीचा अंमलबजावणी करण्याबाबत मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि.९/१/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १८१८ दि.१६/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/वि/६२६२ दि.२७/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**विषय क्र. ३६**

स्वर्गिय राजीव गांधी उद्यान, कात्रज येथील तलावात बोटींग व मासेमारी उपक्रम सुरु करणेबाबत मा.योगेश समेळ यांचे दि. ६/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१०८ दि.१२/२/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/उद्यान/१३९२ दि.३१/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**विषय क्र. ३७**

पुणे महानगरपालिके तर्फे समाज विकास विभागा मार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत तरी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून इ.१० वी साठी शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट र.रुपये ५०००/- इतके अनुदान देण्याबाबत मा .सौ. राणी रायबा भोसले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती व मा.सौ.मुक्ता जगताप यांचे दि.१०.१.२०१८ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १६९ दि.१०/१/२०१८ ला अनुसरुन झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २००९ दि.२३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/सविवि/१३९७ दि.३१/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. ३८**

प्रभाग क्र.५ मध्ये राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यानामध्ये फुलराणी स्टेशन बनविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेरंब एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,५७४=६१ पेक्षा २१.९७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३१,२०,८६८=०६ पर्यंत काम करून घेणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१३९३ दि. ३१/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ३९**

प्रभाग क्र. २८ अ मध्ये रस्ते विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रुषभ कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,९२३=६७ पेक्षा ५.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९३,९९,९३८=२४ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/२ दि. ३/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ४०**

प्रभाग क्र. २८ ड मध्ये शिवनेरी रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गाजुल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,७९९/- पेक्षा ५.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९४,४४,८१०=१५ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/३ दि.३/४/२०१८ चे पत्र.

**टेंडर्स न मागविता ५(२)(२) अन्वये प्रकरणे**

**विषय क्र. ४१**

पुणे शहरातील मुख्य रस्त्याजवळील महत्वाच्या ११ ठिकाणी ईटॉयलेट उभारणे हे काम इराम सायंटीफीक-सोल्यूशन्स प्रा.लि. या कंपनीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण २(२) अन्वये काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१३९१ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण २(२) अन्वये इराम सायंटीफीक-सोल्यूशन्स प्रा.लि. या प्रस्तावास मान्यता मिळणेस व त्यानुसार १४ ई-टॉयलेट ११ ठिकाणी बसविण्याचा तसेच एक वर्ष विनामोबदला देखभाल करणेसाठी र.रुपये १,९९,१३,६००/- पर्यंत खर्च करणेस

२) सदर ई-टॉयलेटसाठी लागणारा खर्च हा पुणे खासदार फंडातून उपलब्ध करुन घेणेस तसेच इराम सायंटीफीक-सोल्यूशन्स प्रा.लि. व पुणे महानगरपालिका यांचेमध्ये करारनामा करणेस व बिल अदा करणेस

**विषय क्र. ४२**

प्रभाग क्र. १३ मधील एरंडवणा मलनि:सारण प्रकल्पाच्या जागेत बायोगॅस प्लँट (Energy Bin) बसविणे हे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील संविदा ५(२)(२) नुसार M/s. Xeon Waste Managers L.L.P. यांचेकडून र.रुपये ९,९८,३००/- पर्यंत जी.एस.टी. व सर्व करांसह त्यांचे दरपत्रकातील अटी व शर्ती स्विकारुन काम करुन घेणेस व त्यानुसार होणारे देयक M/s. Xeon Waste Managers L.L.P. कंपनीला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर अथवा आरटीजीएस याद्वारे आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/१३९६ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ४३**

मा.सौ.रुपाली धाडवे व मा.सौ.वृषाली चौधरी यांचे दि. २०/३/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३७ ब मधील राजा शिवछत्रपती दवाखान्यातील अर्धवट राहिलेले प्रसुतिगृह पूर्ण करणेसाठी र.रू.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, यादी क्र.एसजे६, शहरामध्ये नव्याने प्रसुतिगृह / विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने उभारणे, पान क्र. २२६, अ.क्र. ६२, नविन हॉस्पिटलची उभारणी करणे व सावित्रीबाई नर्सिंग कॉलेज | ५० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>प्रभाग क्र. ३७ ब मधील राजा शिवछत्रपती दवाखान्यातील अर्धवट राहिलेले प्रसुतिगृह पूर्ण करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२७/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

विषय क्र. ४४

युरोपियन युनियन द्वारा अनुदानित व पुणे महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या श्वास प्रकल्पास मुदतवाढ व या कामकाजासाठी करार तत्वावर, एकवट मानधनावर मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१३९० दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) युरोपियन युनियन व पुणे महानगरपालिकेमार्फत जमा करण्यात आलेल्या रकमेतून पुढील एका आर्थिक वर्ष कालावधीसाठी (माहे मार्च २०१८ ते माहे फेब्रुवारी २०१९ अखेर) सध्याचा श्वास प्रकल्प 'युरोपियन युनियन (EU) प्रकल्प कक्ष' या नावाने कार्यान्वित ठेवून प्रकल्पाच्या यापुढे होणाऱ्या खर्चाची रक्कम अदा करणेस

२) वरील कक्षाचे दैनंदिन कामकाजासाठी करार पध्दतीने एकवट मानधनावर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेस

३) मा.महापालिका आयुक्त यांचे मंजुरीने त्रयस्थ संस्थेची निवड करुन या संस्थेकडून एण्ड टर्म इव्हॅल्युएशन अहवाल तयार करुन घेणेस व युरोपियन युनियनला सदर अंतिम अहवाल सादर करणेस

**विषय क्र. ४५**

४५ एमएलडी मुंढवा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम मे.डिग्रीमोंट प्रा.लि. हे काम पाहत असून सदर कंपनीचे नाव मे सुएज इंडिया प्रा.लि. असे बदलण्यात आलेले असल्याने सदर कपंनीसोबत नविन नावाने म्हणजेच मे सुएज इंडिया प्रा.लि. या नावाने नव्याने कार्यादेश देण्यास त्यानुसार त्यांच्याशी नव्याने करारनामा करण्यास व त्यांनी केलेल्या कामापोटी त्यांचे बिल अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत-मलनि:सारण/१३९४ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६१७ दि.१५/७/२०१४ अन्वये दि.१/८/२०१८ ते दि.३१/७/२०१९ पर्यंत ४५ एम एल डी मुंढवा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे करुन घेण्यास

२) मे.डिग्रीमोंट प्रा.लि. ऐवजी मे.सुएज इंडिया प्रा.लि. यांना दि.१/४/२०१७ ते दि.३१/७/२०१९ पर्यंत काम करण्यासाठी नव्याने/पुरवणी कार्यादेश देण्यास आणि त्यानुसार त्यांच्याशी पुरवणी करारनामा करण्यास व त्यांनी केलेल्या कामापोटी टेंडर क्र. - ९७९/२०१३-१४ मधील सर्व अटी व शर्तींना अधीन राहून अदा करणेस

**विषय क्र. ४६**

३२ एमएलडी विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम मे.डिग्रीमोंट प्रा.लि. हे काम पाहत असून सदर कंपनीचे नाव मे सुएज इंडिया प्रा.लि. असे बदलण्यात आलेले असून सदर कपंनीसोबत नविन नावाने म्हणजेच मे सुएज इंडिया प्रा.लि. या नावाने नव्याने कार्यादेश देण्यास त्यानुसार त्यांच्याशी नव्याने करारनामा करण्यास व नव्याने त्यांनी केलेल्या कामापोटी त्यांचे बिल अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत-मलनि:सारण/१३९५ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६६१ दि.२२/७/२०१७ अन्वये दि.१/७/२०१७ ते दि.३१/३/२०२० पर्यंत ३२ एमएलडी विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे करुन घेण्यास

२) मे.डिग्रीमोंट प्रा.लि. ऐवजी मे.सुएज इंडिया प्रा.लि. यांना दि.१/७/२०१७ ते दि.३१/७/२०२० पर्यंत काम करण्यासाठी नव्याने/पुरवणी कार्यादेश देण्यास आणि त्यानुसार त्यांच्याशी पुरवणी करारनामा करण्यास व त्यांनी केलेल्या कामापोटी टेंडर क्र. - ९८३/२०१३-१४ मधील सर्व अटी व शर्तींना अधीन राहून अदा करणेस

**विषय क्र. ४७**

पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता मे.इन्फिनिटी कन्सल्टींग इंजिनिअर्स यांचे तज्ञ सल्लागारांच्या पॅनेलमध्ये वर्ग II (प्रोजेक्ट र.रुपये ५.०० ते २०.०० कोटीपर्यंत) मे.इन्फिनिटी कन्सल्टींग इंजिनिअर्स यांचे मा.स्थायी समितीने यापुर्वी मान्य केलेल्या ठरावामध्ये बदल करुन मे.इन्फिनिटी कन्सल्टींग इंजिनिअर्स यांचे वर्ग (I)मधून पुढील टप्प्यात वर्ग (II) साठी निवड करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/०४ दि.४/४/२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**